# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे

सिंचन भवन, बारणे रोड, मंगळवार पेठ, पुणे-४११ ०११

दूरध्वनी क्र. ०२०-२६१३४९३१/२६१३५२६३ फॅक्स २६१२१५५७


---

क्र. जा.क्र. मकृखोविम/०९/(६०९/२०१५)/प्रशा-२/**११३८** **दिनांक : २२/०३/२०१६**

प्रति

| | |
|---|---|
| मा. राज्यमंत्री, जलसंपदा व जलसंधारण व पदसिद्ध उपाध्यक्ष, | मकृखोविम |
| मुख्य सचिव व पदसिद्ध उपाध्यक्ष | मकृखोविम |
| अप्पर मुख्य सचिव (कृषि) व सदस्य | मकृखोविम |
| अप्पर मुख्य सचिव (वित्त) व सदस्य | मकृखोविम |
| प्रधान सचिव (नियोजन) व सदस्य | मकृखोविम |
| प्रधान सचिव (जसंप्र व वि) व सदस्य | मकृखोविम |
| सचिव (जसंव्य व लाक्षेवि) व सदस्य | मकृखोविम |
| सचिव (वने) व सदस्य | मकृखोविम |
| सचिव (म व पू) व सदस्य | मकृखोविम |

**विषय: महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाची ९१वी बैठक दिनांक ०२/११/२०१५ - कार्यवृत्तांत व ठराव**

महोदय,

मा. मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष, मकृखोविम यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०२/११/२०१५ रोजी संपन्न झालेल्या नियामक मंडळाच्या ९१ व्या बैठकीचे कार्यवृत्तांत व मान्य झालेले ठराव सोबत आपल्या अवलोकनार्थ व माहितीसाठी सादर करण्यांत येत आहेत. याबाबत आपले अभिप्राय ७ दिवसात कळवावेत ही विनंती.

**सोबत : कार्यवृत्तांत व ठराव.**

स्थळ प्रतीवर मा. का. सं. यांची सही असे

**(भि. रा. वाघ)**
**कार्यकारी अभियंता**

प्रत: मा. मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष, मकृखोविम यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२ यांना सहपत्रासह माहितीसाठी सादर.

**सोबत : कार्यवृत्तांत व ठराव**

प्रत: मुख्य अभियंता (जसं)/(विप्र), पुणे यांना सहपत्रासह माहितीसाठी.

**सोबत : कार्यवृत्तांत व ठराव**

प्रत : मा. कार्यकारी संचालक यांचे स्वीय सहाय्यक

**सोबत : कार्यवृत्तांत व ठराव**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
# नियामक मंडळाची ९१ वी बैठक दिनांक ०२ नोव्हेंबर २०१५

## ठराव

मा. ना. गिरीष महाजन, मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ९१ वी बैठक मंगळवार दि. ०२ नोव्हेंबर २०१५ रोजी मा. मंत्री, जलसंपदा यांचे मंत्रालयीन दालन क्र. ३०३, तिसरा मजला, मंत्रालय, मुंबई-३२ येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व निमंत्रित अधिकारी उपस्थित होते.

**सन्माननीय सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. गिरीष महाजन | ... | मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष |
| २. | मा. ना.श्री. विजय शिवतारे | ... | राज्यमंत्री, जलसंपदा व उपाध्यक्ष |
| ३. | मा. श्री. सुधीर श्रीवास्तव | ... | अप्पर मुख्य सचिव (वित्त) व सदस्य |
| ४. | मा. श्री. सुनिल पोरवाल | ... | प्रधान सचिव (नियोजन) व सदस्य |
| ५. | मा. श्री. सतीश गवई | ... | प्रधान सचिव (जसंप्र व वि) व सदस्य |
| ६. | मा. इंजि. शि. मा. उपासे | ... | सचिव (जसंव्य व लाक्षेवि) व सदस्य |
| ५. | मा. श्री. सतीश गवई | ... | प्रधान सचिव (जप्र व वि) व सदस्य |
| ६. | मा. इंजि. शि. मा. उपासे | ... | सचिव (जव्यसं व लावि) व सदस्य |
| ७. | इंजि. रा. ब. घोटे | ... | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

**निमंत्रित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | इं. क. म. शाह | ... | मुख्य अभियंता (विप्र), पुणे |
| २. | इं. अ.कि. सुरुशे | ... | मुख्य अभियंता (जसं), पुणे |
| ३. | श्री. विरेंद्र जाधवराव | ... | मुख्य लेखा व वित्त अधिकारी |

"मान्य"

**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**मा.मंत्री, जलसंपदा**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९१ वी बैठक दिनांक ०२ नोव्हेंबर २०१५

### ठराव

**ठराव क्र. ९१/१**

"ठराव करण्यात येतो की, दि. २७/५/२०१५ रोजी संपन्न झालेल्या नियामक मंडळाच्या ९० व्या बैठकीत पारित केलेल्या ठरावावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचे नियामक मंडळाने अवलोकन केले आहे."

**ठराव क्र. ९१/२**

"ठराव करण्यांत येतो की, सन २०१५-१६ या कालावधीचा महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचा भांडवली अर्थसंकल्प राज्य सार्वजनिक उपक्रम पुनर्विलोकन समितीस सादर करण्याकरिता शासनाचे परिपत्रक दि. १६/०१/२०१५ अन्वये दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने सन २०१५-१६ या कालावधीचा महामंडळाच्या भांडवली अर्थसंकल्पास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र. ९१/३**

"ठराव करण्यात येतो की, सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाचा महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचा ताळेबंद व प्रकल्प प्रगती लेखा महामंडळाचे सनदी लेखापाल यांनी तयार केला असून त्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव क्र. ९१/४**

ठराव करण्यात येतो की, महामंडळाचे आर्थिक वर्ष सन २०१५-१६ या कालावधीचे लेखे संकलन व एकत्रीकरण करण्यासाठी एकत्रित रक्कम रु.७,२६,०००/- (रुपये सात लक्ष सव्वीस हजार फक्त) अधिक सेवा कर या फी नुसार व विहीत कार्यव्यापानुसार मे.सतीश नागरे आणि असोसिएटस, मुंबई सनदी लेखापाल यांच्या नियुक्तीस मुदतवाढ देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव क्र. ९१/५**

"ठराव करण्यात येतो की, मे.चोखरा आणि गांधी, सनदी लेखापाल यांची अंतर्गत लेखा परीक्षक म्हणून सन २०१५-१६ या वर्षाची नियुक्ती प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्यात येऊन महामंडळाचे आर्थिक वर्ष सन २०१५-१६ या कालावधीसाठी अंतर्गत लेखा परीक्षण करण्यासाठी प्रती कार्यालय प्रती सहामाही रक्कम रु. ११,५००/- (रुपये अकरा हजार पाचशे फक्त) अधिक सेवा कर या फी नुसार व विहीत कार्यव्यापानुसार मे.कोलते ॲन्ड असोसिएटस्, सनदी लेखापाल,

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९१ वी बैठक दिनांक ०२ नोव्हेंबर २०१५

पुणे यांच्या नियुक्तीस मान्यता मिळण्यासाठीच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र. ९१/६**

"ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम १९९६, प्रकरण २, कलम-७ (१) नुसारचे विनियम मसुद्यास शासन मान्यतेसाठी सादर करण्यासाठी सदरच्या मसुदा प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र. ९१/७**

"ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे येथील विद्यमान कायदे सल्लागार श्री. डी. डी. शिंदे यांना दि. ३०/११/२०१५ पर्यंत पूर्वी मंजूर झालेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून नवीन कायदे सल्लागाराचो नियुक्ती होईपर्यंत मुदतवाढ देण्याच्या कार्यवाहीस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे"

**ठराव क्र. ९१/८**

"ठराव करण्यात येतो की, महामंडळातंर्गत न्यायालयीन कामकाज सुरळीत चालवणेकामी कायदेशीर सल्ला देण्यासाठी पूर्ण वेळ कायदे सल्लागाराची तातडीची गरज लक्षात घेता अनुभवी निवृत्त जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश ॲड श्री. दिलीप कृष्णा गायकवाड यांची महामंडळाचे नवीन कायदे सल्लागार म्हणून एका वर्षासाठी पूर्ण वेळ व सर्व कार्यालयीन दिवसासाठी नियुक्ती करणे व त्यांना दरमहा रु. ६०,०००/- इतके मानधन, अनुषंगिक इतर भत्ते व सोयीसुविधा देणेबाबत नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र.९१/९**

"ठराव करण्यात येतो की, महामंडळातंर्गत न्यायालयीन प्रकरणी लवाद व भुसंपादनाबाबत उच्च न्यायालय/ सर्वोच्च न्यायालयात महामंडळाची बाजु समर्थपणे मांडण्याचे दृष्टीने प्रकरणाचे गांर्भीय व तातडी विचारात घेता अनुभवी व सक्षम वरिष्ठ विधिज्ञाचे (Senior Counsels) पॅनेल नियुक्त करावे व त्यातून सक्षम विधीज्ञाच्या नियुक्ती बाबतची, तसेच त्यांचे फी निश्चिती बाबत शासनाचे प्रचलित नियमानुसार मान्यतेची कार्यवाही कार्यकारी संचालक यांनी करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९१ वी बैठक दिनांक ०२ नोव्हेंबर २०१५

ठराव क्र. ९१/१०

"ठराव करण्यात येतो की, महामंडळांतर्गत वर्ग-१ अधिका-यांनी अतितातडीच्या परिस्थितीत करावयाच्या विमान प्रवासास परवानगी देण्याबाबतचे अधिकार कार्यकारी संचालक यांना देणेबाबतचा ठराव नियामक मंडळाने अमान्य केला आहे."

ठराव क्र. ९१/११

"ठराव करण्यात येतो की, जिहे कठापूर उपसा सिंचन योजनेंतर्गत मौजे सुलतानवाडी, ता.कोरेगाव येथील उर्ध्वगामी नलिकेच्या कामासाठी संपादित केलेल्या क्षेत्रातील नुकसान होणाऱ्या फळझाडे व वन झाडांची मुल्यांकन रक्कम रु. ५,८५,८२०/- अदायगी करणेस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ९१/१२

"ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या मालकीची उजनी धरणासाठी संपादित केलेली मौजे कुंभारगांव, ता. इंदापूर, जि. पुणे येथील संपादित गट नं. ३३९, ३४८ व ३४९ या गटामधील १.६८ हेक्टर (१६८०० चौ. मी.) जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, बारामती यांना पाणी पुरवठा योजनेसाठी शासनाचे / महामंडळाचे प्रचलित दराने ३० वर्षे कालावधीसाठी भाडेपट्ट्याने देणेबाबतच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ९१/१३

"ठराव करण्यात येतो की, महामंडळाचे मालकीची भामा आसखेड धरण वसाहतीसाठी संपादित केलेली मौजे करंजविहिरे येथील गट नं. ९ मधील ०.४० हे. संपादित विनावापर जागा मोजणी करुन जागेची चालू मुल्यांकनानुसार होणारी किंमत महामंडळास मिळणेचे अटीवर जिल्हाधिकारी, पुणे यांचेमार्फत कायमस्वरुपी महाराष्ट्र राज्य वितरण कंपनीस देणे बाबतच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ९१/१४

"ठराव करण्यात येतो की, महामंडळाचे ताब्यातील मौजे नांदवळ, ता. कोरेगांव येथील गट नं. १२१५ मधील संपादित २ आर. जागा सार्वजनिक नळ पाणीपुरवठा योजना विहिरीसाठी ग्रामपंचायत नायगांव, ता. कोरेगांव यांना प्रत्यक्ष मोजणी करुन जिल्हाधिकारी सातारा यांचेमार्फत हस्तांतरीत करणेबाबतच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९१ वी बैठक दिनांक ०२ नोव्हेंबर २०१५

**ठराव क्र. ९१/१५**

"ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या मालकीची हाडशी क्र. १ ता.मुळशी प्रकल्पाच्या शेजारी मौ.काशींग,ता.मुळशी,जि.पुणे गट क्र.५९६ मधील संपादीत क्षेत्रातील बंद असलेली २२७० चौफु ची (२१०.९३चौ.मी.)शासकीय निरीक्षण चौकी व शेजारील ३४३० चौ.फु.(३१८.७७ चौ.मी.)मोकळी जागा मे.वैदिका ॲग्रो सोल्युशन प्रा.लि. पुणे या संस्थेस प्रती वर्षी ११ महिने कालावधीसाठी मत्स्य व्यवसाय संवर्धन व विकास कामासाठी भाडेपट्टयाने देणे बाबतच्या प्रस्तावाबाबत नियामक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली. तथापि महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे पत्र क्र. ३०/०९/२००८ अन्वये महामंडळांतर्गत अतिरिक्त जमिन वाटपाबाबत झालेल्या अनियमितते विरुद्ध मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आलेली असून, सदर याचिकेचा अंतिम न्यायनिर्णय होईपर्यंत जमिन वाटपाबाबत कोणतीही कार्यवाही करु नये अशा सूचना प्राप्त आहेत.सदर प्राप्त सूचनांचा विचार होऊन याबाबत कोणताही ठराव पारित करण्यात आला नाही."

**ठराव क्र. ९१/१६**

"ठराव करण्यात येतो की, भामा आसखेड प्रकल्प, ता.खेड, जि.पुणे, प्रकल्पांतर्गत अंशत: बाधित मौजे पाईट, (गवारवाडी पापळवाडी) ता.खेड, जि.पुणे प्रकल्पग्रस्तांनी स्वत:चे शेतात बांधलेल्या वस्त्यांवर मागण्या केलेल्या नागरी सुविधांचा (नळ पाणी पुरवठा योजना, खूली विहिर, अंतर्गत खडीचे रस्ते, ग्रामपंचायत कार्यालय, स्मशानभूमी शेड, शाळा इमारत, समाज मंदिर - रु.१.६८ कोटी) प्रस्ताव व आराखड्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र. ९१/१७**

"ठराव करण्यात येतो की, उस्मानाबाद व बीड जिल्ह्यातील प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणेबाबतच्या कार्यवाहीबाबत नियामक मंडळाने अवलोकन केले आहे."

**ठराव क्र. ९१/१८**

"ठराव करण्यात येतो की, कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्पासाठी शासनाकडून नियमित २७०१ लेखाशिर्षातर्गत (CRC) संगणक सांकेतांक मिळेपर्यत सध्याची तीव्र दुष्काळी परिस्थिती विचारात घेता सदरचा दि. ३१/०३/२०१६ पर्यंतचा प्रकल्पाच्या देखभाल दुरुस्तीचा खर्च महामंडळाचे स्वनिधीतून करण्यास अथवा लेखाशीर्ष "४७०१-मोठे व मध्यम प्रकल्प" या लेखाशीर्षामधून करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र. ९१/१९**

"ठराव करण्यात येतो की, पुरंदर उपसा सिंचन प्रकल्पासाठी शासनाकडुन नियमित २७०१ लेखाशिर्षातर्गत (CRC) संगणक सांकेतांक मिळेपर्यत सध्याची तीव्र दुष्काळी परिस्थिती विचारात घेता सदरचा दि. ३१/०३/२०१६ पर्यंतचा प्रकल्पाच्या देखभाल दुरुस्तीचा खर्च महामंडळाचे स्वनिधीतून करण्यास अथवा लेखाशीर्ष "४७०१-मोठे व मध्यम प्रकल्प" या लेखाशीर्षामधून करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९१ वी बैठक दिनांक ०२ नोव्हेंबर २०१५

**ठराव क्र. ९१/२०**

**"ठराव करण्यात येतो की, जनाई शिरसाई उपसा सिंचन प्रकल्पासाठी शासनाकडून नियमित २७०१ लेखाशिर्षांतर्गत (CRC) निधी मिळेपर्यंत सध्याची तीव्र दुष्काळी परिस्थिती विचारात घेता सदरचा दि. ३१/०३/२०१६ पर्यंतचा प्रकल्पाच्या देखभाल दुरुस्तीचा खर्च महामंडळाचे स्वनिधीतून करण्यास अथवा लेखाशीर्ष "४७०१-मोठे व मध्यम प्रकल्प" या लेखाशीर्षामधून करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

**ठराव क्र. ९१/२१**

**"ठराव करण्यात येतो की, टेंभू उपसा सिंचन प्रकल्पासाठी शासनाकडून नियमित २७०१ लेखाशिर्षांतर्गत (CRC) संगणक सांकेतांक मिळेपर्यंत सध्याची तीव्र दुष्काळी परिस्थिती विचारात घेता सदरचा दि. ३१/०३/२०१६ पर्यंतचा प्रकल्पाच्या देखभाल दुरुस्तीचा खर्च महामंडळाचे स्वनिधीतून करण्यास अथवा लेखाशीर्ष "४७०१-मोठे व मध्यम प्रकल्प" या लेखाशीर्षामधून करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

तद्नंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**"मान्य"**

**(इंजि. रा. ब.घोटे)**
**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**(मा. ना. श्री. गिरीष महाजन)**
**मा.मंत्री, जलसंपदा**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**